आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२५ डिसेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांची शंभरावी जयंती सुशासनाची प्रेरणा देणारी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन,

- केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते दहा हजारापेक्षा जास्त कृषी संघटनांचं लोकार्पण

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या प्रधानमंत्री राष्ट्रीय बालपुरस्कारांचं वितरण करणार

- कझकिस्तानमध्ये विमान कोसळून झालेल्या अपघातात अनेक जण दगावल्याची भीती,

**आणि**

- आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत जसप्रीत बुमराह अग्रस्थानी, रविचंद्रन अश्विनच्या कामगिरीशी केली बरोबरी.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांची आजची शतकमहोत्सवी जयंती आपणा सर्वांसाठी सुशासनाची प्रेरणा घेण्याचा दिवस आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मध्य प्रदेशातल्या खजुराहो इथं देशातल्या पहिल्या, महत्त्वाकांक्षी आणि बहुद्देशीय केन-बेटवा राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाची पायाभरणी आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली, त्यावेळी ते बोलत होते. देशातल्या पहिल्या, ओंकारेश्वर तरंगत्या

सौरऊर्जा प्रकल्पाचं लोकार्पण, तसंच १ हजार १५३ अटल ग्राम सुशासन भवनांचं भूमिपूजनही मोदी यांनी यावेळी केलं. याशिवाय, वाजपेयींच्या स्मरणार्थ एक विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशनही त्यांच्या हस्ते झालं. दिवंगत अटल बिहारी वाजपेयी नेहमीच सुशासनाचा प्रेरणास्रोत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले,

***बाईटः प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

गेल्या दशकात देशभरात जलसुरक्षा आणि जलसंवर्धन या क्षेत्रात ऐतिहासिक काम झाल्याचं मोदी यांनी नमूद केलं. याआधीच्या सरकारांनी या क्षेत्राकडे दुर्लक्ष केल्याचं सांगून देशाच्या जलस्रोतांचा विकास करण्याचं धोरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आखलं, असं मोदी यांनी सांगितलं. मध्य प्रदेशचे राज्यपाल मांगूभाई पटेल, मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पटेल यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्लीमध्ये पुसा इथं नव्यानं स्थापन झालेल्या दहा हजारापेक्षा जास्त बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचं लोकार्पण केलं. यावेळी त्यांनी या संस्थांना नोंदणी प्रमाणपत्रं, रुपे किसान क्रेडिट कार्ड आणि मायक्रो एटीएमचं वितरणही केलं.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नवी दिल्लीतल्या सीआरपीएफ अर्थात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या मुख्यालयात सीआरपीएफचं काम आणि प्रशासकीय कार्यक्षमतेचा समावेशक आढावा घेतला. देशात अंतर्गत

सुरक्षा आणि शांतता राखण्यात सीआरपीएफ महत्वाची भूमिका बजावत असल्याचं ते यावेळी म्हणाले. नक्षलवादाचा सामना करण्यात, तसंच ईशान्येकडची राज्यं आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यात केंद्रीय सशस्त्र निमलष्करी दलानं प्रशंसनीय काम केल्याचं शहा यांनी सांगितलं.

<><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या नवी दिल्ली इथं विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १७ मुलांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बालपुरस्कारानं गौरवणार आहेत. कला आणि संस्कृती, शौर्य, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण या क्षेत्रांमध्ये हे पुरस्कार दिले जातील. पदक, प्रमाणपत्र आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्लीच्या भारत मंडपम इथं वीर बाल दिवस या कार्यक्रमाला संबोधित करतील. ‘सुपोषित ग्राम पंचायत अभियाना’चा प्रारंभही ते करणार आहेत. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचे विजेतेही या कार्यक्रमाला हजेरी लावणार आहेत.

<><><><>

दीर्घकालीन आणि अर्थपूर्ण बदलासाठी शासनपद्धतीतल्या सुधारणांची सुरुवात तळागाळापासून व्हायला हवी, असं प्रतिपादन कर्मचारी, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी केलं आहे. सुशासन दिनाच्या निमित्ताने सिंह यांनी आज विकसित पंचायत कर्मयोगी उपक्रमाचं उद्घाटन केलं. त्यावेळी ते बोलत होते.

<><><><>

देशाला स्वातंत्र्य मिळालं, त्यावेळी देशात मलेरियाचे साडेसात कोटी रुग्ण होते, ती संख्या २०२३पर्यंत ९७ टक्क्यांनी कमी होऊन २० लाखांवर आली आहे. आरोग्य मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, २०२३मध्ये विविध राज्यांमधल्या १२२ जिल्ह्यांमध्ये मलेरियाचा एकही रुग्ण आढळून आला नाही. २०३०पर्यंत देशाला मलेरियामुक्त करण्याचं उद्दिष्ट ठेवून सरकार काम करत आहे. मलेरियाच्या उच्चाटनासाठी दीर्घकालीन धोरणं, तसंच राष्ट्रीय धोरणात्मक आराखडाही तयार केला आहे.

**<><><><><>**

कझाकस्तानच्या अकताऊ विमानतळाजवळ अझरबैझान एअरलाइन्सचं विमान कोसळून अनेक जण दगावले. मृतांचा आकडा अद्याप स्पष्ट झालेला नाही. या विमानात सुमारे ७० प्रवासी आणि पाच कर्मचारी होते. रशियाला जात असलेलं हे विमान कझाक शहराजवळ तातडीनं उतरण्याचा प्रयत्न करताना तांत्रिक बिघाड झाल्यानं अपघातग्रस्त झालं. या विमानातल्या किमान ३० प्रवाशांना वाचवण्यात आलं असून त्यातील २२ जणांना रुग्णालयात दाखल केल्याचं कझाकिस्तानचे आपतकालीन मंत्रालयानं सांगितलं. विमानाच्या मार्गात पक्ष्यांचा थवा आल्याचं रशियन माध्यमांनी म्हटलं आहे, मात्र याला अद्याप दुजोरा मिळालेला नाही. अझरबैजान आणि कझाकस्तान या दोन्ही देशांनी या अपघाताची चौकशी सुरू केली आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानच्या लढाऊ विमानांनी काल रात्री अफगाणिस्तानच्या पूर्व पाकतिका प्रांतात केलेल्या बॉम्बहल्ल्यात किमान ४६ जणांचा मृत्यू झाल्याचा दावा अफगाणिस्तानच्या तालिबान प्रशासनानं केला आहे. या

हल्ल्यात सहा जण जखमी झाल्याचं, शिवाय अनेक घरांचं नुकसान झाल्याचंही उपप्रवक्ते मुल्ला हमदुल्ला फितरात यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

प्रभू येशू ख्रिस्तांचा जन्मदिवस अर्थात नाताळ आज जगभरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. व्हॅटिकन सिटीतल्या सेंट पीटर्स बॅसिलिका इथल्या पवित्र दरवाजाचं दर्शन घेण्यासाठी आज पहाटेपासूनच भाविकांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. याशिवाय ऑस्ट्रेलिया, नेपाळमध्येही ख्रिस्ती बांधवांनी मोठ्या उत्साहात नाताळ साजरा केला.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते ऑक्टोबर दरम्यान अनिवासी भारतीयांच्या एनआरआय खात्यांमधल्या ठेवींचा ओघ वाढून तो ११ अब्ज ९० कोटी डॉलर्सवर पोहोचल्याचं भारतीय रिझर्व बँकेनं जारी केलेल्या ताज्या आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><><>

कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी संघटना म्हणजेच EPFOने या वर्षीच्या ऑक्टोबरपर्यंत एकंदर १३ लाख ४१ हजार सदस्यांची नोंदणी केली आहे. रोजगाराच्या वाढत्या संधी, कर्मचाऱ्यांच्या हिताबद्दलची वाढती जाणीव तसंच EPFO च्या प्रयत्नांमुळे ही वाढ दिसून येत असल्याचं कर्मचारी आणि रोजगार मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

उत्तराखंडच्या नैनीताल जिल्ह्यात भीमतालजवळ प्रवासी बस दरीत

कोसळून झालेल्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला, तर २४ जण जखमी झाले. पिठोरगडहून हल्दानीला जाणाऱ्या या बसमध्ये एकंदर २८ प्रवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अपघाताच्या ठिकाणी मदतकार्य सुरू आहे. या दुर्घटनेबद्दल उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

लडाखमध्ये किमान तापमानात आणखी घट होऊन संपूर्ण भागात थंडीची तीव्र लाट आली आहे. भारत-चीन सीमेवरच्या न्योमा इथं पारा उणे २० अंश सेल्सिअसच्याही खाली घसरला आहे. तर तांगत्से इथं उणे १५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

**<><><><><>**

आयसीसी पुरुष कसोटी गोलंदाजी क्रमवारीत भारताचा आघाडीचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यानं ९०४ गुणांसह पहिलं स्थान मिळवलं आहे. यासोबतच त्यानं कोणत्याही भारतीय गोलंदाजाने मिळवलेल्या सर्वाधिक गुणांच्या विक्रमात फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनच्या विक्रमाशी बरोबरी केली. ब्रिस्बेन कसोटीत ९४ धावांच्या मोबदल्यात ९ गडी टिपण्याच्या कामगिरीमुळे बुमराहनं १४ गुण मिळवून पहिलं स्थान कायम राखलं आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या मेलबर्न कसोटीत हा विक्रम मोडण्याची संधीही बुमराहला मिळणार आहे.

**//<><><><><><>//**